**नियमित दिवाणी दावा क्रमांक १५३/२०२१ मधील अर्ज**
**(निशाणी क्रमांक २८) वरील आदेश**
(सीएनआर क्र.एमएचएएच०८-०००२७०-२०२१)

प्रस्तुत अर्ज वादी यांनी दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी म्हणून दाखल केलेला आहे.

०२. वादी यांचे म्हणणे असे आहे की, प्रस्तुत दावा वाटप व मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. दावा दाखल केला त्यावेळी दावा मिळकतीपैकी काही क्षेत्र रस्त्यासाठी संपादित झाले असल्याची माहिती वादींना नव्हती. त्याबाबत दावा दाखल केल्यानंतर माहिती झाली. संपादित क्षेत्राची नुकसान भरपाई मंजुर झालेली आहे व त्यापैकी काही रक्कम प्रतिवादी क्रमांक १ ने काढुन घेतलेली आहे. त्यामध्ये वादींचा हिस्सा आहे. असे असताना प्रतिवादी क्रमांक १ ने सदर रक्कम परस्पर काढल्यामुळे दाव्यात दुरुस्ती करणे आवश्यक झाले आहे. या कारणांनी वादी दाव्यामध्ये नविन परिच्छेद क्रमांक ४अ सामील करण्याची परवानगी मिळावी म्हणुन विनंती करत आहे. तसेच सदर विनंतीच्या अनुशंगाने दाव्याच्या अंतिम मागणीमध्ये देखील मनाई हुकूम मागण्याकरीता दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी वादीची विनंती आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, वरिलप्रमाणे दुरुस्ती केल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. न्यायाच्या दृष्टीने सदर दुरुस्ती आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादीचे नुकसान होणार नाही. मात्र परवानगी न दिल्यास वादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे अर्ज मंजुर करण्याची विनंती वादींनी केलेली आहे.

०३. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी निशाणी क्र. ३४ नुसार सदर अर्जाचा म्हणणे दाखल करुन विरोध केलेला आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, दावा मिळकतीचे १९८९ साली वाटप झालेले आहे. एकत्र कुटूंब अस्तित्वात राहिलेले नाही. वादी प्रतिवादी क्र. ३ व ४ यांचा दावा मिळकतीत हक्क नाही. त्यामुळे नियोजीत दुरुस्ती मागता येणार नाही. वादीचा नुकसान भरपाईच्या रकमेमध्ये कोणताही हिस्सा नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर करावा अशी विनंती प्रतिवादींनी केलेली आहे.

०४. वादी व प्रतिवादींतर्फे वकीलांचे म्हणणे ऐकले. प्रस्तुत दावा हा वाटप व मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. दावा अद्याप पुरावा नोंदविण्याकरीता नेमण्यात आलेला नाही. दाव्यामध्ये अद्याप मुद्दे देखील काढलेले नाही. मनाई हुकूमाच्या अर्जाच्या सुनावणीकरीता दावा प्रलंबित असतांना प्रस्तुत अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्रमांक १ यांना दावा जमीन सरकारने संपादित केलयामुळे नुकसान भरपाई मिळालेली आहे व सदर बाब दावा दाखल करताना वादीस माहित नव्हती त्यामुळे दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे वादींचे म्हणणे आहे. प्रतिवादींचे म्हणणे पाहता नुकसान भरपाई मिळाल्याबाबत प्रतिवादींनी नाकारलेले नाही. मात्र नुकसान भरपाईच्या रकमेमध्ये वादी व इतर प्रतिवादींना काहिही हक्क राहिला नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. प्रतिवादी म्हणतात त्या प्रमाणे वादी व इतर प्रतिवादींना नुकसान भरपाई रकमेमध्ये हक्क आहे

किंवा नाही ही बाब वादींना त्याबाबत नियोजित दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्याशिवाय ठरवता येणार नाही. वादींना नुकसान भरपाई रक्कम मिळाल्याबाबत दावा करण्या आधीपासुन माहिती होती असे प्रतिवादींचे म्हणणे नाही. वादींना तशी माहिती असती तर निश्चितच वादींनी त्याबाबत दाव्यामध्ये उल्लेख केला असता व त्या अनुशंगाने दाद मागितली असती. तसा उल्लेख दाव्यात केला नाही म्हणुन वादीचा काहिही लाभ झालेला नाही किंवा होणार नाही. उलट कदाचित नुकसानच होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वादींना दाव्यानंतरच सदर बाब माहिती झाली असे म्हणावे लागेल.

०५. नियोजित दुरुस्ती करुन वादी नुकसान भरपाईच्या रकमेबाबत, क्षेत्राबाबत व त्या संदर्भात दाखल झालेल्या अर्जांबाबत दाव्यामध्ये उल्लेख करु पाहत आहे. त्या अनुशंगाने अंतिम विनंती म्हणुन मनाई हुकूम देखील वादी मागु पाहत आहे. सदरची दुरुस्ती मुळ दाव्याशी सुसंगत असल्याचे दिसते. दावा जमिनी वडीलोपार्जित असल्याचा व त्यामध्ये आपला हिस्सा असल्याचे वादींचे म्हणणे आहे. त्यामुळे नुकसान भरपाईच्या रकमेमध्ये वादींचा हिस्सा आहे का ही बाब मुळ दाव्याशी सुसंगत आहे. नियोजित दुरुस्ती पक्षकारांमधील वाद निकाली काढण्याकरीता आवश्यक असल्याचे दिसते. जर वादीस त्याबाबत परवानगी दिली तर सदर दुरुस्तीचा विरोध अतिरिक्त कैफियत दाखल करुन करण्याची संधी प्रतिवादींना उपलब्ध आहे. त्यामुळे प्रतिवादींचे नुकसान होण्याची शक्यता नाही. सबब, अर्ज मंजूर करणे योग्य ठरेल. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**आ दे श**

०१. प्रस्तुत अर्ज (नि.क्र.२८) मंजुर करण्यात येत आहे.

०२. वादी यांना वर नमूद दुरुस्ती पुढील तारखेपर्यंत करण्यास परवानगी देण्यात येत आहे. वादी यांनी दाव्यात दुरुस्ती केल्यानंतर दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर सादर करावी.

MANSOOR MAHAMOOD SHAIKH
Digitally signed by MANSOOR MAHAMOOD SHAIKH
Date: 2023.07.05 16:37:14 +0530

ठिकाण :- संगमनेर.
दिनांक :- ०५.०७.२०२३.

(एम. एम. शेख)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
संगमनेर.